**पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ - ६ यांचे कार्यालय,**
नवीन प्रशासकीय इमारत ४ था माळा , आर.सी. मार्ग,
चेंबुर, मुंबई-४०००७१
दुरध्वनी क्र. **022&25229303**
Email ID-
dcpzone6-mum@mahapolice.gov.in
zone6stat@gmail.com




**प्रेस नोट**

दिनांक २८/०८/२०२६

( मानखुर्द पोलीस ठाणे )

**मोक्का गुन्ह्यातील सहा महिन्यापासुन फरार असलेल्या अरविंद सोडा गँग च्या सदस्यास अटक केले बाबत**

मानखुर्द पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्रं. ५४/२०२६ कलम ३०८(५), ३५१(३), ३२९(३), ३३३ भारतीय न्याय संहिता सह महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९(MCOCA) चे कलम ३(१), ३(२), ३(४) अन्वये गुन्ह्यातील आरोपी नामे अश्फाक ए.शमशुद्दीन खान उर्फ बब्बु वय ३९ वर्षे, हा गुन्हा दाखल झाल्यापासुन फरार होता. सदर आरोपी अटक टाळण्यासाठी मागील सहा महिन्यापासुन त्याचे अस्तित्व लपवित होता. सदर आरोपीचे मोबाईल क्रंमाकाचे सीडीआर व सोशल मिडीया अकाउंटसचे तांत्रिक विश्लेषण, तसेच संपर्कातील व्यक्तीची माहीती काढुन शोध घेणे सुरु होते. तसेच गोपनिय बातमीदारांना सदर आरोपीताचा शोध घेणे बाबत माहीती देण्यात आलेली होती.

गोपनिय बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, सदर आरोपी हा कल्याण परिसरात स्वतःचे अस्तित्व लपवुन राहत आहे, त्यामुळे तांत्रिक विश्लेषण करुन व स्थानिक बातमीदारामार्फत माहीती काढुन त्याच्या आस्तित्व व राहण्याच्या ठिकाणाबाबत निश्चिती करण्यात आली, तो राहत असलेल्या परिसरात पोलीसांमार्फत पाळत ठेवुन त्यास पळुन जाण्यास वाव न देता पोलीस पथकाने शिताफीने त्यास ताब्यात घेतले. त्यास अटक करुन, मा.विशेष सत्र न्यायालय, मोक्का कोर्ट, मुंबई येथे हजर करण्यात आले असता त्यास मा. न्यायालयाने ०८ दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केलेली असुन पुढील तपास सुरु आहे.

सदरची उल्लेखनिय कामगीरी मा. पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त का. व सु श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग श्री. धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त पुर्व परिमंडळ ०१ समीर शेख, सहायक पोलीस आयुक्त ट्रॉम्बे विभाग प्रमोद कोकाटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिलाल शेख मानखुर्द पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि नंदुलाल पाटील, पोउपनि अजय गोल्हार, पोउपनि गिरीष माळवे, पोशि रोहीत पाटील, पोशि रोहीत बाड, पोशि दत्तात्रय केदार, पोशि प्रविण घाडगे, पोशि प्रविण पाटील व मपोशि कांबळे यांनी केली.